महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील अधिकाऱ्यांसाठी ट्यूनिक गणवेश बंद <u>करणेबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : E-705544/H.D.-13022/10/2023-POL4**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,

दिनांक - ०२ जुलै, २०२४

**वाचा** :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/४४/तरतुद/गणवेश/११/ २०१८/२५, दि.२७.०१.२०२२.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र पोलीस नियमावली व १९९९ भाग १ प्रकरण ७ मध्ये खालील नियमामध्ये पोलीस अधिकाऱ्यासाठी नियम २११ नुसार पोलीस उप अधिक्षकांसाठी, नियम २१२ नुसार पोलीस निरिक्षकांसाठी, नियम २१३ नुसार पोलीस उप निरिक्षकांसाठी गणवेषासाठी तरतूद आहे. सध्या काही ठिकाणी महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस अधिकारी समारंभ, परेड, ध्वजवंदना दरम्यान कामासाठी घालण्यात येणाऱ्या गणवेषावर ट्युनिक गणवेषासाठी लागणाऱ्या साहित्यांसह क्रॉस बेल्ट परिधान करीत असतात.

पोलीस अनुसंधान व विकास संस्थेने (Bureau of Police Research and Development-BPRD) National Design Business Incubator (NDBI) या संस्थेमार्फत Smart Policemen-Developing Designing and trial High Performance Uniform Articles and Accessories या विषयावर भारतातील वेगवेगळ्या राज्यातील पोलीस दलांच्या गणवेषाचा २०१७ पासून पाच वर्षे अभ्यास करुन २०२१ मध्ये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात पोलीसांचा गणवेष SMART, व्यावसायिक, अधिकार व्यक्त करणारा, कामाची ओळख देऊन गर्व वाटणारा, ठसा उमटवणारा, कामास संरक्षण देणारा, वेगवेगळ्या वातावरणाशी निगडीत, वापरण्यास व सांभाळण्यास सुलभ असावा तसेच गणवेष हा विश्वासाचा व प्रतिमा उजळ करणारा प्रतिक असावा. या सर्व बाबींचा विचार करुन पोलीसांच्या गणवेषाच्या काही साहित्यांत अंशःत बदल तर काही साहित्य कालबाहय व निरुपयोगी ठरवून त्यात संपूर्णत: बदल करण्याबाबत सुचवले आहे. BPRD अहवालास प्रमाण मानून महाराष्ट्र पोलीस दलातील ट्युनिक युनिफॉर्म व त्यावर लावण्यात येणारे साहित्य याचा अभ्यास करुन तसेच महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता टयुनिक युनिफॉर्म वापरणे अडचणीचे व आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखे नाही यास्तव ट्युनिक युनिफॉर्म बंद करण्याच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक कार्यालयाकडून महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील अधिकाऱ्यांसाठी असलेला ट्युनिक गणवेष परिधान करणे बंद करावा किंवा तो आहे तसा राहू द्यावा, याकरिता महाराष्ट्र पोलीस दलातील सर्व घटक प्रमुख्यांचे अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यापैकी एकूण ५३ घटकांनी युनिक गणवेष बंद करण्याची शिफारस केली असून, उर्वरित ७ घटकांनी युनिक युनिफॉर्म राहू देण्याची शिफारस केली आहे. त्यास अनुसरुन पोलीस महासंचालक कार्यालयाने महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीचा विचार

करता टयुनिक युनिफॉर्म वापरणे अडचणीचे व आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखे नसल्याने ट्यूनिक युनिफॉर्म बंद करण्याचा तसेच, महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ प्रकरण-७ मधील नियम क्र. २११, २१२ व २१३ मधील ट्यूनिक युनिफॉर्मसाठी असलेल्या तरतुदी रद्द करुन, तसा शासन निर्णय निर्गमित करण्यास पोलीस महासंचालक कार्यालय यांनी विनंती केली असून त्यानुसार महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील अधिकाऱ्यांसाठी ट्यूनिक गणवेश बंद करणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता टयुनिक युनिफॉर्म वापरणे अडचणीचे व आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखे नसल्याने महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील अधिकाऱ्यांसाठी ट्यूनिक युनिफॉर्म बंद करण्यास तसेच महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ प्रकरण-७ मधील नियम क्र. २११, २१२ व २१३ मधील ट्यूनिक युनिफॉर्मसाठी असलेल्या तरतुदी रद्द करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**२.** सदरची मान्यता महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ प्रकरण-७ मधील नियम क्र. २११, २१२ व २१३ मधील ट्यूनिक युनिफॉर्मसाठी असलेल्या तरतुदी रद्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही पोलीस महासंचालक कार्यालयाकडून करण्यात येईल, या अटीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

**३.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२४०७०२१३१९२२७१२९ असा आहे. हा शासन निणर्य डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SUDHAKAR SHAHAJI YADAV

Digitally signed by SUDHAKAR SHAHAJI YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=3e782c1e59acd749fc48c691d7a8c477d6ac39c1904204f442b52d728d48a67a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A576ADA378C3E1DDFF427C2BC46B5A5C32BC32EF80F7A475ABFA122778AAAD72, cn=SUDHAKAR SHAHAJI YADAV
Date: 2024.07.02 14:51:35 +05'30'

**( सुधाकर यादव )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रती,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. सर्व सन्मानिय संसद सदस्य, विधानसभा व विधानपरिषद सदस्य
५. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
६. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
७. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
८. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०००३२
९. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
११. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई

१२.प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर

१३.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई-४०००३२

१४.प्रबंधक, मा.मुंबई उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई (पत्राने)

१५.पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१६.सर्व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१७. महासमादेशक, होमगार्डस,महाराष्ट्र राज्य,मुंबई

१८. महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट्र राज्य, मुंबई

१९.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई

२०.सर्व पोलीस आयुक्तालये, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२१.सर्व अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२२.सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२३. सर्व पोलीस उप महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२४. सर्व पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२५. अधिदान व लेखा अधिकारी/निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

२६.निवडनस्ती /पोल-४